# <u>जाहिरात</u>

## <u>जिल्हा व सत्र न्यायालय, गोंदिया</u>

<u>**दिनांक ०२/०८/२०२१.**</u>

(१) जिल्हा व सत्र न्यायालय, गोंदिया यांच्या आस्थापनेवरील **'सफाईगार'** पदाकरीता ०५ (पाच) उमेदवारांची निवड सूची आणि ०२ (दोन) उमेदवारांची प्रतिक्षा सूची तयार करण्यासाठी तसेच **'पहारेकरी'** पदाकरीता ०३ (तिन) उमेदवारांची निवड सूची आणि ०३ (तिन) उमेदवारांची प्रतिक्षा सूची तयार करण्यासाठी ऑफलाईन अर्ज मागविण्यात येत आहेत.

सविस्तर जाहिरात विहीत अर्जाच्या नमुन्यासह, जिल्हा व सत्र न्यायालय, गोंदियाचे अधिकृत संकेतस्थळ https://districts.ecourts.gov.in/gondia किंवा https://districts.ecourts.gov.in/maharashtra या संकेतस्थळावर दिनांक ०२/०८/२०२१ च्या सकाळी ११ वाजता पासून उपलब्ध राहील. सदर नमुना डाऊनलोड करता येईल.

पात्र उमेदवारांनी जाहिरातीमध्ये दिलेल्या नमुन्यातच अर्ज करावेत.
अर्ज नोंदणीकृत पोच देय डाकेने/पत्राद्वारे म्हणजेच (RPAD) ने किंवा शिघ्र डाक सेवा पोच पावतीसह म्हणजेच स्पीड पोस्टने या कार्यालयास पाठवावेत. कोणत्याही परिस्थितीत हस्तप्रेक्षणाद्वारे म्हणजेच (By hand/e-mail/Whatsapp) व्दारे अर्ज स्वीकारले जाणार नाहीत, याची अर्जदारांनी नोंद घ्यावी.

अर्ज स्विकारण्याची अंतीम तारीख १३/०८/२०२१ सायंकाळी ५:३० वाजतापर्यंत राहील.
मुदती नंतर प्राप्त झालेल्या अर्जांचा विचार केला जाणार नाही.
अर्ज विहीत नमुन्यात व ऑफलाईन पध्दतीने करावयाचे आहे.

(२) मा. उच्च न्यायालयाच्या अधिसूचना क्र. नियम/एक्स–२३१९/७१, दि. २० नोव्हेंबर २०१९ नुसार ०१ टक्के पदे दिव्यांग व्यक्तीसाठी आरक्षित ठेवण्यात येत आहेत.

**(३) <u>पात्रतेचे निकष :—</u>**

**<u>१) सफाईगार पदाकरीता :—</u>**

अ) अर्हता :— लिहीता वाचता येणे.

ब) सूदृढ शरिरयष्टी आणि पदाचे कामाचे स्वरूप विचारात घेवून सर्वार्थाने सक्षम असणे आवश्यक.

**<u>२) पहारेकरी पदाकरीता :—</u>**

अ) अर्हता :— कमीतकमी ७ वा वर्ग मराठी भाषेसह उत्तीर्ण असावा.

ब) सूदृढ शरिरयष्टी आणि पदाचे कामाचे स्वरूप विचारात घेवून सर्वार्थाने सक्षम असणे आवश्यक.

**(४) <u>अपात्र उमेदवार :—</u>**

अ) १८ वर्षापेक्षा कमी वयाचा उमेदवार.

ब) दिनांक २८/०३/२००५ नंतर जन्मास आलेल्या अपत्यांमूळे उमेदवाराच्या ह्यात अपत्यांची संख्या एकुण २ (दोन) पेक्षा जास्त असल्यास.

**<u>(५) वयोमर्यादा</u>**

अ) खुल्या प्रवर्गातील उमेदवाराचे वय १८ पेक्षा कमी व ३८ वर्षापेक्षा जास्त नसावे.

ब) अनुसुचीत जाती/जमाती, ईतर मागास वर्ग किंवा व्ही.जे. एन.टी किंवा महाराष्ट्र शासनाद्वारे मागास प्रवर्गाकरीता १८ वर्षापेक्षा कमी आणि ४३ वर्षापेक्षा जास्त नसावे. ज्या उमेदवाराची ५ (ब) नुसार नियुक्ती होईल त्यास त्या प्रवर्गाची जात वैधता प्रमाणपत्र नियुक्ती पासून १ वर्षापर्यंत करून घेणे बंधनकारक राहील. जर नियुक्त उमेदवाराने जात वैधता प्रमाणपत्र करून घेतले नाही किंवा सादर केले नाही, तर त्याची उमेदवारी रद्द समजण्यात येईल. कोणत्याही परिस्थितीत त्याची उमेदवारी खुल्या प्रवर्गात विचारात घेतल्या जाणार नाही. जात वैधता प्रमाणपत्र उपलब्ध असल्यास मुलाखतीचे वेळेस उमेदवार जात वैधता प्रमाणपत्र सादर करू शकतो.

क) शासन निर्णय क्र. एसआरव्ही १०७७/३५७४६/१४३३/१६—अ, दि. २३/०५/१९७८ नुसार दिव्यांग

व्यक्ती जर त्या अन्यथा योग्य व सदर पदाची कर्तव्ये पार पाडण्याकरिता सक्षम असेल तर त्याच्या बाबतीत सेवा प्रवेशासाठी विहीत केलेली उच्च/कमाल वयामर्यादा ४५ वर्षांपर्यंत शिथीलक्षम केली आहे.

**(६) कामाचे स्वरूप :—**

**१. सफाईगार पदाकरीता :—**

अ) निवड झालेल्या उमेदवारांची जेथे नियुक्ती केली जाईल तेथील न्यायालय ईमारतींची, ईमारत परिसराची, निवासी कार्यालयांची व प्रसाधन गृहांची नियमित स्वच्छता व साफसफाई करणे आणि निगा राखणे.

ब) न्यायालय ईमारतींच्या आवारातील आवश्यकतेनूसार बागकाम करण्याचे काम, तसेच आवश्यक जागांवर जंतूनाशक फवारणी करणे. न्यायाधीशांचे दालन, न्यायालय कक्ष स्वच्छ करणे.

क) वरिल अ व ब मध्ये नमूद केलेल्या कामाव्यतिरीक्त न्यायीक अधिकारी व आस्थापना अधिकारी ह्यांचे निर्देशानूसार सर्व ती आवश्यक कामे करणे. पदाला अनूसरून सर्व कर्तव्ये पार पाडण्याची क्षमता असावी.

ड) **'सफाईगार'** हे पद एकाकी असून पदोन्नतीची संधी उपलब्ध नाही. याबाबतची उमेदवाराने नोंद घ्यावी.

**२. पहारेकरी पदाकरीता :—**

अ) पहारेकरी पदावर नियुक्त उमेदवार हे न्यायालयीन ईमारतीच्या आवारात सुरक्षा/पहारा देणे.

ब) कामाच्या तासापूर्वी आणि नंतर न्यायालयीन कक्ष नियमीतपणे उघडणे व बंद करणे. न्यायालयीन वेळेच्या व्यतिरीक्त वेळेमध्ये न्यायालय परिसरात प्रवेश करणा—या व्यक्तीची नोंदवहीत नोंद घेणे.

क) रात्रीच्या वेळेत न्यायालयीन संपूर्ण परिसराची देखरेख करणे.

ड) वरिल अ, ब व क मध्ये नमूद केलेल्या कामाव्यतिरीक्त न्यायीक अधिकारी व आस्थापना अधिकारी ह्यांचे निर्देशानूसार सर्व ती आवश्यक कामे करणे.

**(७) वेतनश्रेणी :—**

**अ) सफाईगार पदाकरीता :—**

सातव्या वेतन आयोगानूसार वेतन स्तर (एस—१) या वेतन संरचनेत रू. १५,००० — ४७,६००/— व नियमानूसार इतर देय भत्ते.

**ब)** **<u>पहारेकरी पदाकरीता :–</u>**

सातव्या वेतन आयोगानूसार वेतन स्तर (एस–१) या वेतन संरचनेत रू. १५,००० – ४७,६००/– व नियमानूसार इतर देय भत्ते.

**(८) उमेदवारांकरिता महत्वाच्या सुचना :–**

(१) पात्र उमेदवाराने जाहिरातीमध्ये दिलेल्या नमुन्यातच अर्ज भरावा.

(२) अर्ज पाठवावयाच्या बंद लिफाफ्यावर ठळक अक्षरात **'सफाईगार पदाकरीता अर्ज'** किंवा **'पहारेकरी पदाकरीता अर्ज'** असा स्पष्ट उल्लेख करून प्रबंधक, जिल्हा व सत्र न्यायालय, गोंदिया यांचेकडे पाठवावेत. एका उमेदवारास दोन वेगवेगळ्या पदाकरीता अर्ज करावयाचे असल्यास दोन वेगवेगळे अर्ज सादर करावे. एकाच अर्जावर दोन्ही पदे किंवा एकाच लिफाफ्यावर दोन्ही पदे लिहील्यास ते रद्द समजले जाईल.

(३) उमेदवाराने अर्ज नोंदणीकृत पोच देय डाकेने म्हणजेच (RPAD) किंवा शिघ्र डाकसेवेने (Speed Post)

पोचपावतीसह **प्रबंधक, जिल्हा व सत्र न्यायालय, गोंदिया, सिव्हील लाईन, प्रशासकीय ईमारत चे बाजूला, गोंदिया** या पत्त्यावर कार्यालयात दिनांक १३/०८/२०२१ रोजी सायंकाळी ५:३० वाजतापर्यंत किंवा त्यापूर्वी पोहचतील अशा बेताने पाठवावे.

(४) ऐन वेळेची घाई गर्दी टाळण्यासाठी उमेदवारांना सूचीत करण्यात येते की, त्यांनी त्यांचे अर्ज पूरेसा कालावधी शिल्लक असतांनाच सादर करावेत.

(५) कोणत्याही परिस्थितीत हस्तप्रेक्षणाद्वारे (By hand/e-mail/Whatsapp) व्दारे अर्ज स्विकारले जाणार नाही.

(६) अर्ज स्विकारण्याच्या अंतिम तारखेनंतर प्राप्त अर्जांचा, परिच्छेद ८ सूचना क्र. ३ व्यतिरीक्त आलेल्या अर्जांचा, डाकेने विलंब झालेल्या अर्जांचा, बंद पाकीटावर **'सफाईगार पदाकरिता अर्ज'** किंवा **'पहारेकरी पदाकरीता अर्ज'** नाव नमूद नसलेल्या अर्जांचा विचार केला जाणार नाही.

(७) अधिसुचीत करण्यात आलेल्या पदांची संख्या ढोबळमताने परीगणीत केलेली असून त्यात आवश्यकतेनूसार बदल होवू शकतो. अधिसुचीत केलेल्या संख्येइतक्या उमेदवारांची निवड उपलब्धता, प्रशासनाची,

आस्थापनेची आवश्यकता विचारात घेवून, परिस्थितीनूसार समर्थनिय कारण विचारात घेवून अधिसुचित संख्येपेक्षा कमी/जास्त उमेदवारांची निवड समिती करू शकतो.

(८) अर्ज करणा—या उमेदवारांना सुस्पष्ट जाणीव करून देण्यात येत आहे की, त्यांनी उमेदवारी अर्ज सादर केला म्हणून त्यांना चाचणी/मुलाखतीस बोलविण्याचा कोणताही अधिकार प्राप्त होत नाही. निवड समिती, प्रशासकीय, आस्थापनीय निकड विचारात घेवून, प्राप्त झालेले अर्ज लघुसूचीत करू शकेल व लघुसूचीत होण्यात यशस्वी झालेल्या उमेदवारांचाच पूढील टप्प्यांसाठी विचार केला जाईल. उमेदवाराची शैक्षणिक अर्हता संबंधाने निवड समिती ठरवील ते निकष लागू करून, त्यांची लघुसुची तयार करण्याचा अधिकार निवड समितीस आहे. ही लघूसुची जिल्हा न्यायालय, गोंदिया यांचे संकेतस्थळ तसेच सुचना फलकावर प्रसिध्द करण्यात येईल. लघुसुचीत नावाची नोंद असलेल्या उमेदवाराने प्रवेशपत्र जिल्हा न्यायालय, गोंदिया येथुन प्राप्त करावे. त्या करीता स्वत:चे दोन नुकतेच काढलेले अर्जावर चिटकविलेले छायाचित्र दाखल करावे. हे प्रवेश पत्र पुढील चाचणी/परीक्षा/मुलाखत करीता जपुन ठेवावे.

(९) प्रवेशपत्र प्राप्त करतांना उमेदवाराने आपली ओळख पटविणारा कोणताही दस्त, जसे की:— आधार कार्ड, पारपत्र, वाहन चालविण्याचा परवाना, मतदान ओळखपत्र, पॅन कार्ड, छायाचित्र असलेले ओळखपत्र, त्यांच्या मालकाने अथवा शैक्षणीक संस्थेने प्रदान केलेले, ईत्यादी. सादर करावे.

(१०) उमेदवारांनी आपले अर्ज जिल्हा न्यायालयाच्या संकेतस्थळावरून डाऊनलोड करून घेवून, केवळ (ए—४) आकाराच्या, चांगल्या दर्जाच्या कागदावर, सुस्पष्ट व सुवाच्च अक्षरात भरून, दिनांक १३ ऑगस्ट, २०२१ रोजी सायंकाळी ०५:३० वाजेपर्यंत (सुट्टीचे दिवस वगळता) पोचतील या बेताने आधी नमूद केल्याप्रमाणे पोस्टाने पाठवावेत.

**उमेदवाराने अर्जासोबत कोणतीही मुळ कागदपत्रे/प्रमाणपत्रे अथवा साक्षांकित प्रती जोडू नयेत. उमेदवारांना मुळ कागदपत्रे सादर करण्याबाबत योग्य वेळी सूचना दिली जाईल.**

**या कार्यालयाने भरती प्रक्रियेकरिता कोणत्याही प्रकारचे शुल्क आकारलेले नसून ती पूर्णपणे निशुल्क आहे, याची उमेदवारांनी नोंद घ्यावी. तसेच अर्जासोबत कोणत्याही प्रकारचे शुल्क जसे की, दर्शनी धनाकर्ष (Demand Draft), प्रदानादेश (Pay Order) धनादेश (Cheque) ईत्यादी जोडू नये.**

(११) उमेदवारांनी आपले अर्जावर निर्दिष्ट जागी त्याचे/तिचे पासपोर्ट आकाराचे नवीनतम छायाचित्र चिकटवावे

आणि त्यावर आपली स्वाक्षरी करावी. स्वाक्षरीची सुरूवात छायाचित्रावर करून तिचा काही भाग छायाचित्राबाहेर येईल अशा रितीने स्वाक्षरी करावी.

(१२) **उमेदवारांनी आपले अर्जासोबत स्वतःच्या नावासह संपूर्ण पत्ता असलेला लिफाफा ५ रूपयाचे डाक तिकीट लावून तसेच दोन नुकतेच काढलेले पासपोर्ट साईजचे छायाचित्रासह पाठवावा.**

(१३) चाचणीत पात्र ठरलेल्या उमेदवारांची नावे जिल्हा व सत्र न्यायालय गोंदियाच्या संकेतस्थळावर तसेच जिल्हा न्यायालय, गोंदियाचे सुचना फलकावर अधिसूचीत करण्यात येईल. तसेच उमेदवारांनी वेळोवेळी संकेतस्थळास भेट देणे त्यांचे हिताचे राहील.

(१४) चाचणीत पात्र ठरलेल्या उमेदवारांनी पुढील प्रक्रीयेकरीता त्यांना मिळालेले प्रवेशपत्र दिलेल्या तारखांना सोबत आणावे.

(१५) जे उमेदवार या पुर्वीच शासकीय सेवेत आहेत, त्यांनी त्यांचे विभाग/कार्यालय प्रमुखाची लेखी परवानगी घेवूनच अर्ज सादर करावा. असे परवानगीपत्र मुलाखतीच्या वेळी सादर करावी. तसेच उमेदवारांनी आपले अर्ज आपआपल्या विभाग/कार्यालय प्रमुखांमार्फत पाठविण्याची आवश्यकता नाही.

(१६) एका उमेदवाराने एका पदाकरीता केवळ एकच अर्ज सादर करावा.

(१७) अपूर्ण अर्ज किंवा असा अर्ज, जो उमेदवाराने सादर केलेल्या तपशिलामूळे त्यास पदासाठी अपात्र ठरवेल, बाद ठरविला जाईल आणि त्यांबाबत कोणतीही तक्रार किंवा उजर ऐकला जाणार नाही.

(१८) सफाईगार या पदाचे चाचणीस पात्र ठरलेल्या उमेदवारांची श्रमचाफल्य, क्रियाशिलता चाचणी व स्वच्छता चाचणी त्याचप्रमाणे पहारेकरी पदाकरीता वस्तूनिष्ठ स्वरूपाची चाचणी तसेच निवड समितीने ठरविल्यानुसार अन्य सुयोग्य कोणतीही चाचणी घेतली जाईल. त्याबाबतच्या सूचना जिल्हा व सत्र न्यायालय, गोंदियाचे संकेतस्थळावर आणि जिल्हा न्यायालयाच्या सूचना फलकावर दिल्या जातील. याकरीता संबंधीत उमेदवारांनी वेळोवेळी जिल्हा व सत्र न्यायालय, गोंदियाचे संकेतस्थळास भेट देणे त्यांचे हिताचे राहील.

(१९) अनूक्रमांक १८ वरिल प्रमाणे नमूद चाचणीत/परिक्षेत यशस्वी झालेल्या उमेदवारांनाच मुलाखतीकरीता बोलविले जावू शकेल.

(२०) जे उमेदवार मुलाखतीकरीता पात्र ठरतील व मुलाखतीकरीता बोलविले जाईल, अशा उमेदवारांनी मुलाखतीचेवेळी खालील प्रमाणपत्रांच्या साक्षांकीत प्रती आणि त्यांची मूळ कागदपत्रे जिल्हा व सत्र न्यायालयाने नेमून दिलेल्या अधिका—यांकडे सादर करावीत.

अ) जन्म प्रमाणपत्र, जन्माचा दाखला उदा. बोर्ड सर्टीफिकेट, टी.सी. ईत्यादी पुरावा.

ब) उमेदवाराने मुळ अर्जामध्ये नमुद केलेल्या, दोन सन्माननीय व्यक्तींनी दिलेले चारित्र्याचे दाखले तसेच त्याचे विरूध्द कुठल्याही न्यायालयात कोणताही फौजदारी खटला चालू किंवा प्रस्तावित नसल्याचे प्रमाणपत्र, कोणताही फौजदारी खटला असल्यास त्याचा तपशिल.

क) अर्हतेच्या रकान्यामध्ये नमूद केलेल्या अर्हता/परीक्षा उत्तीर्ण केल्याबाबतचा दाखला.

ड) अन्य अर्हता या रकान्यामध्ये नमूद केल्यानूसार अर्हता/परिक्षा उत्तीर्ण केल्याबाबचा दाखला.

इ) शासकीय जिल्हा शल्यचिकीत्सक/वैद्यकीय अधिक्षक यांनी दिलेला अपंगत्वाचा दाखला, लागू असल्यास.

ई) शासनाच्या सक्षम अधिका—याने दिलेला जातीचा दाखला, जेथे लागू असेल तेथे.

उ) जिल्हा न्यायालयाच्या संकेतस्थळावर उपलब्ध असलेले फौजदारी प्रकरण प्रलंबित नसल्याबाबत/लहान कुटुंबाबाबतचे प्रतिज्ञापत्र नमूना—ए, मूळ.

ऊ) उमेदवार यापूर्वीच शासकीय सेवेत कार्यरत असेल तर संबंधित विभागाचे ना—हरकत प्रमाणपत्र.

(२१) प्राप्त झालेल्या अर्जांची लघुसूची/चाचणी/मौखिक चाचणी ई. बाबींसाठी कमाल गुण आणि पुढील टप्प्यासाठी यशस्वी होण्याकरिता ठरविण्यात आलेले निम्नतम पात्रता गुण (बेंच मार्क) ठरविण्याचा अधिकार निवड समितीस असून त्याबाबत निवड समितीचा निर्णय अंतिम राहील.

(२२) उमेदवारांना चाचणी/मुलाखतीस बोलविले गेले तर त्यांनी निश्चित केलेल्या तारखांना आणि ठिकाणी स्वखर्चाने उपस्थित राहावे लागेल. त्यांना खर्चाचा परतावा दिल्या जाणार नाही.

(२३) उमेदवाराने निवड प्रक्रियेच्या संदर्भात स्वत: किंवा कोणामार्फत निवड समितीच्या सदस्यांना अथवा न्यायिक विभागाच्या अधिका—यांना भेटण्याचा किंवा त्यांचेवर दबाव आणण्याचा किंवा वशिला लावण्याचा प्रयत्न केल्यास त्यास अपात्र ठरविण्यात येईल आणि या बाबतीत निवड समितीचा निर्णय अंतीम राहील.

(२४) उमेदवारांची निवड ही काटेकोरपणे, उमेदवारांना सर्व चाचणी आणि मुलाखतीत मिळालेल्या गुणांच्या आधारे तयार करण्यात येणा—या गुणवत्ता क्रमानुसार करण्यात येईल.

(२५) निवड सुची/प्रतिक्षा सुची ही मा. उच्च न्यायालयाच्या मान्यतेस अधीन राहून मा. उच्च न्यायालय विहीत करेल, अशा कालावधीसाठी वैध राहील.

(२६) निवड झालेल्या उमेदवारांची सेवा ही मा. उच्च न्यायालय आणि महाराष्ट्र शासनाद्वारे वेळोवेळी तयार करण्यात आलेल्या नियमांप्रमाणे असेल.

(२७) उमेदवारांना शासनाच्या प्रचलित नियमांनूसार अंशदान निवृत्तीवेतन योजना व शासकीय नोकरीच्या प्रयोजनार्थ गठीत सर्व अटी व शर्ती लागू राहतील.

(२८) उमेदवारांची सेवा त्यांच्याबाबत संबंधित पोलीस अधिक्षक/पोलीस आयुक्त कार्यालयाकडून प्राप्त करवून घेतल्या जाणा—या चारित्र्य पडताळणी प्रमाणपत्रास अधिन राहून असेल.

(२९) चुका टाळण्यासाठी, अर्ज पाठविण्यापूर्वी उमेदवारांनी संकेतस्थळावर दाखविण्यात येणा—या सूचना लक्षपूर्वक वाचाव्यात.

(३०) प्रत्येक उमेदवाराचा एका पदासाठी एकच अर्ज असेल, जर एकाच उमेदवाराने एकाच पदासाठी अनेक अर्ज भरले तर, फक्त पहिला अर्ज विचारात घेतला जाईल. जर आवश्यक अर्हतेप्रमाणे उमेदवार अर्हताप्राप्त नसेल, तर त्या पदाचा पर्याय त्याच्यासाठी उपलब्ध नसेल.

(३१) उमेदवारांनी याची नोंद घ्यावी की, उमेदवारांनी दिलेली माहिती खरी आहे, असे समजून त्यांची पात्रता निर्धारित करण्यात येईल. जर एखाद्या उमेदवाराने दिलेली माहिती ही खोटी, सदोष अथवा चुकीची आहे, असे आढळून आल्यास, अशा उमेदवारास केवळ अनर्ह ठरविण्यात येईल असे नव्हे, तर त्यावर खटलासुध्दा भरण्यात येईल. अशा उमेदवारास कोणत्याही परिक्षेस बसण्यास मनाई करण्यात येईल. त्यास जिल्हा न्यायालयांतील कोणत्याही पदासाठी अर्ज करण्यास मनाई करण्यात येईल.

(३२) **'सफाईगार'** पदाकरिता ज्या उमेदवारांची नावे लघुसूचीत करण्यात आली आहेत, अशा उमेदवारांना **'सफाईगार'** पदाकरीता १० गुणांची स्वच्छता व १० गुणांची क्रियाशिलता चाचण्यांकरीता बोलाविण्यात येईल व त्यांना सेवा भरती समिती यांचे कडून निश्चित केल्या जाणा—या 'कट ऑफ' गुण मिळविणे आवश्यक राहील. अशा सर्व उमेदवारांना स्वच्छता व क्रियाशिलता चाचणीमध्ये मिळालेल्या जास्तीत जास्त गुणांचे आधारे नमूद पदांच्या संख्येच्या तीन पट (१:३) हे प्रमाण राखण्यासाठी लघुसूचीत केलेल्या उमेदवारांपैकी शेवटच्या उमेदवाराइतके गुण मिळविणारे एकापेक्षा अधिक उमेदवार असतील तर, अशा सर्व

उमेदवारांना मुलाखतीकरिता बोलाविले जाईल. मुलाखत २० गुणांची राहील. अशी तयार करण्यात आलेली यादी मुलाखतीच्या वेळापत्रकासहित जिल्हा न्यायालयाच्या कार्यालयात प्रदर्शित करण्यात येईल.

(३३) **'पहारेकरी'** पदाकरिता ज्या उमेदवारांची नावे लघुसूचीत करण्यात आली आहेत, अशा उमेदवारांना **'पहारेकरी'** पदाकरीता इतिहास, भुगोल, सामान्य ज्ञान, मराठी भाषेचे ज्ञान व चालू घडामोडी या विषयांवर आधारीत २० गुणांची वस्तूनिष्ठ (Objective) स्वरूपाची परिक्षा घेण्यात येईल व त्यांना सेवा भरती समिती यांचे कडून निश्चित केल्या जाणा—या 'कट ऑफ' गुण मिळविणे आवश्यक राहील. अशा सर्व उमेदवारांना वस्तूनिष्ठ परिक्षेमध्ये मिळालेल्या जास्तीत जास्त गुणांचे आधारे नमूद पदांच्या संख्येच्या तीन पट (१:३) हे प्रमाण राखण्यासाठी लघुसूचीत केलेल्या उमेदवारांपैकी शेवटच्या उमेदवाराइतके गुण मिळविणारे एकापेक्षा अधिक उमेदवार असतील तर, अशा सर्व उमेदवारांना मुलाखतीकरिता बोलाविले जाईल. अशी तयार करण्यात आलेली यादी मुलाखतीच्या वेळापत्रकासहित जिल्हा न्यायालयाच्या कार्यालयात प्रदर्शित करण्यात येईल. मुलाखत २० गुणांची राहील.

(३४) सदर समिती **'सफाईगार'** व **'पहारेकरी'** पदासाठी अंतिम निवड/प्रतिक्षायादी तयार करेल, ज्यात उमेदवारांनी प्रत्येक चाचणी परीक्षेत एकुण मिळविलेल्या गुणांचा उल्लेख असेल.

(३५) समितीने असे ठरविले आहे की, जेथे निवड करण्यासाठी निम्नतम पात्रता गुण निश्चित करण्यात आले नसतील, तेथे असे निम्नतम पात्रता गुण ३५ टक्के असावेत आणि अनुसूचित जाती/अनुसुचीत जमातीच्या उमेदवारांसाठी हे गुण ३० टक्के राहतील. सदर प्रक्रिया बंधनकारक नसल्यामूळे धोरणात्मक असेल. याची नोंद घ्यावी.

(३६) निवड/प्रतिक्षा यादीतील उमेदवारांची संख्या ही जाहिरातीत दिलेल्या पदांपेक्षा जास्त नसेल.

(३७) उच्च न्यायालयाच्या मान्यतेनंतरच निवड/प्रतिक्षा सूची, जिल्हा न्यायालय, गोंदियाच्या सुचना फलकावर दर्शविली जाईल आणि जिल्हा न्यायालयाच्या उपरोल्लिखित अधिकृत संकेतस्थळावर प्रसिध्द केली जाईल.

(३८) सेवाप्रवेश प्रक्रियेच्या वेळापत्रकात या कार्यालयाचे नियंत्रण नसलेल्या कोणत्याही अकल्पित घटनांच्या घडण्यासापेक्ष बदल होवू शकतो. असा बदल वेळोवेळी कार्यालयाच्या सुचनाफलकावर व अधिकृत संकेतस्थळावर अधिसूचित करण्यात येईल.

आदेशान्वये

सही/—

प्रबंधक,

जिल्हा न्यायालय, गोंदिया.

दिनांक :— ०२ ऑगस्ट, २०२१.

| फक्त कार्यालयीन उपयोगाकरीता | |
|---|---|
| **नोंदणी क्र.** | |
| **दिनांक** | /०८/२०२१ |

# <u>जिल्हा व सत्र न्यायालय, गोंदिया</u>

## <u>‘सफाईगार’ / ‘पहारेकरी’ पदासाठी अर्जाचा विहित नमुना</u>

<u>(ज्या पदाकरीता अर्ज सादर करावयाचे आहे ते पद राहू दयावे व इतर खोडून टाकावे)</u>

| नुकतेच काढलेले छायाचित्र |
|---|

पदाचे नाव :– ......................................................

१) उमेदवाराचे संपूर्ण नांव :– ......................................................................................................

(आडनांव प्रथम) (प्रथम नांव) (वडिलांचे/पतीचे नांव)

२) पत्रव्यवहाराचा पत्ता :–......................................................................................................

(स्थायी) ......................................................................................................

पिनकोड ..................... भ्रमणध्वनी क्रमांक (कार्यरत) ................................

ई–मेल, असल्यास ..........................................................................

३) अस्थायी पत्ता :– ......................................................................................................

......................................................................................................

भ्रमणध्वनी क्रमांक (कार्यरत क्रमांकाचे व्यतीरिक्त) ................................

४) सेवायोजन कार्यालयातील :– ...............................................................................................
नोंदणी क्रमांक, असल्यास

५) लिंग (पुरूष / स्त्री) :– ..........................................................................................

६) जात व प्रवर्ग :– ..........................................................................................

७) जन्म तारीख :– ..........................................................................................

८) उमेदवाराचे जाहिरातीच्या :– .........वर्ष ..................महिने................दिवस...............................
दिवशीचे वय

९) उमेदवार दिव्यांग आहे काय?:– होय / नाही

असल्यास दिव्यंगत्वाचे प्रमाण :– .....................................

१०) उमेदवार सध्या शासकीय :– होय / नाही
सेवेत आहे काय ?
असल्यास तपशिल :– ..........................................................................................

११) उमेदवार प्रकल्पग्रस्त :– होय / नाही
आहे काय?

१२) उमेदवार अविवाहीत / :– ..........................................................................................
विवाहीत आहे काय ?

१३) उमेदवारास मराठी लिहीता/ :– ..........................................................................................
वाचता येते काय? आणि
समजते काय?

१४) शैक्षणीक अर्हतेचा तपशील (असल्यास) :–

| **अर्हता** | **मंडळ / विद्यापीठ** | **उत्तीर्ण झाल्याचे वर्ष** | **प्राप्त गुण** | **कमाल गुण** | **गुणांची टक्केवारी** | **ग्रेड/श्रेणी** | **किती प्रयत्नात उत्तीर्ण झाले** |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | |
| | | | | | | | |
| | | | | | | | |
| | | | | | | | |

१५) अन्य अर्हता, जसे संगणक/टंकलेखन/श्रृतलेखन (असल्यास).

| अ. क्र. | कोर्सचे नाव | शब्द प्रति मिनीटे | शासकीय संस्था /मंडळ ज्यांनी टंकलेखन/श्रृतलेखन/संगणक प्रमाणपत्र दिले. | उत्तीर्ण झाल्याचे वर्ष | प्राप्त ग्रेड |
|---|---|---|---|---|---|
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |

१६) कामाचा पुर्वानुभव आहे काय असल्यास तपशिल. :— ..............................................................................

१७) न्यायसंस्थेत कार्यरत नातेवाईकांचा संपूर्ण तपशिल, असल्यास. :— ..............................................................................

१८) उमेदवारांस ओळखत असलेल्या दोन प्रतिष्ठित व्यक्तींची नावे व पत्ते तसेच भ्रमणध्वनी क्रमांक. :— १) ..............................................................................

..............................................................................

२) ..............................................................................

..............................................................................

१९) उमेदवारावर पूर्वी फौजदारी खटला/शिस्तभंगाची कार्यवाही झाली होती काय?/शिक्षा झाली होती काय?/खटला/कार्यवाही प्रलंबीत आहे काय? असल्यास तपशिल. :— ..............................................................................

..............................................................................

..............................................................................

# <u>घोषणा</u>

मी, वर नमुद उमेदवार, याद्वारे घोषीत करतो/करते की मला यापूर्वी शासकीय सेवेकरिता अपात्र घोषीत करण्यात आलेले नाही. तसेच मला फौजदारी गुन्ह्यात अटक अथवा शिक्षा झालेली नाही आणि माझ्याविरूध्द कोणत्याही प्रकारची शिस्तभंगाची कार्यवाही/फौजदारी न्यायालयामध्ये खटला प्रलंबित अथवा प्रस्तावित नाही.

मी, याद्वारे शपथपूर्वक असेही घोषीत करतो/करते की, अर्जामध्ये नमूद केलेली माहीती माझ्या माहितीनुसार सत्य आणि बरोबर आहे. त्यातील कोणतीही गोष्ट खोटी/चुकीची आढळल्यास, मला निवड प्रक्रियेपासून अपात्र घोषीत केले जाईल आणि जर निवड/नेमणुक झाल्यास, माझी सेवा कोणतीही सूचना दिल्याविना समाप्त केली जाईल, याची मला जाणीव आहे.

तसेच दिनांक २८ मार्च २००५ नंतर जन्मलेल्या अपत्यांची संख्या दोन पेक्षा जास्त असल्यास मला सदर पदावरून अपात्र ठरविण्यात येईल.

उमेदवारी अर्ज सादर केला म्हणून मला चाचणी/मुलाखतीस बोलाविले जाण्याचा कोणताही अधिकार प्राप्त होत नाही, याची मला जाणीव आहे.

..................................................

उमेदवाराची स्वाक्षरी

ठिकाण :— ......................

..................................................

दिनांक :— ......................

उमेदवाराचे नांव

# सेवाप्रवेश क्रमसूची

| अ. क्र. | दिनांक | प्रक्रिया |
|---|---|---|
| १. | ०२/०८/२०२१ | जाहिरातीची स्थानिक वृत्तपत्रात व जिल्हा न्यायालयाच्या संकेस्थळावर प्रसिध्दी |
| २. | १३/०८/२०२१ | ऑफलाईन अर्ज स्विकारण्याची अंतीम दिनांक |
| ३. | २७/०८/२०२१ | प्राप्त अर्जांची छाननी करून सुचिबध्द केलेली लघुसुची चाचणीस/परीक्षेस पात्र उमेदवारांची सुची जिल्हा न्यायालय, गोंदियाच्या सुचना फलकावर तसेच संकेतस्थळावर प्रसिध्दी |
| ४. | २८/०८/२०२१, ३०/०८/२०२१ व ०१/०९/२०२१ ते ०३/०९/२०२१ पर्यंत | लघुसुचीबध्द चाचणीस/परीक्षेस पात्र झालेल्या उमेदवारांनी आपले स्वत:चे ओळखपत्र जसे: आधारकार्ड, पारपत्र, वाहन चालविण्याचा परवाना, मतदान ओळखपत्र, पॅन कार्ड, छायाचित्र असलेले ओळखपत्र त्यांच्या मालकाने अथवा शैक्षणीक संस्थेने प्रदान केलेले, ईत्यादी. घेवून व्यक्तीश: जिल्हा न्यायालय, गोंदिया येथे येवून प्रवेशपत्र कार्यालयीन वेळेत प्राप्त करून घ्यावे. |
| ५. | ०५/०९/२०२१ | सफाईगार पदाकरीता उमेदवारांची क्रियाशिलता व स्वच्छता चाचणी. |
| ६. | ०७/०९/२०२१ | सफाईगार पदाकरीता घेण्यात आलेल्या क्रियाशिलता व स्वच्छता चाचणीचा निकाल जिल्हा न्यायालय, गोंदियाच्या सुचना फलकावर तसेच संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येईल. |
| ७. | ०८/०९/२०२१ | पहारेकरी पदाकरीता उमेदवारांची वस्तुनिष्ठ स्वरूपाची परिक्षा. |
| ८. | ०९/०९/२०२१ | पहारेकरी पदाकरीता घेण्यात आलेल्या वस्तुनिष्ठ स्वरूपाच्या चाचणीचा निकाल जिल्हा न्यायालय, गोंदियाच्या सुचना फलकावर तसेच संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येईल. |
| ९. | १४/०९/२०२१ | सफाईगार पदाकरीता पात्र उमेदवारांची मूळ प्रमाणपत्रे तपासणी आणि मुलाखती |
| १०. | १५/०९/२०२१ | पहारेकरी पदाकरीता पात्र उमेदवारांची मूळ प्रमाणपत्रे तपासणी आणि मुलाखती |
| ११. | पात्र उमेदवारांची अंतिम यादी मा. उच्च न्यायालयास मान्यतेकरिता पाठविल्या जाईल त्यानंतर ती मंजूर होवून आल्यानंतर जिल्हा न्यायालय, गोंदियाच्या सूचना फलकावर तसेच संकेतस्थळावर प्रसिध्द केल्या जाईल. | |

**टिप** :– उपरोक्त क्रमसुचीनुसार (वेळापत्रकानूसार) जर कोणत्याही दिवशी वर ठरल्यानूसार कार्यक्रम (चाचणी/परीक्षा/मुलाखत) घेता आली नाही तर तो कार्यक्रम पूढील दिवशी किंवा निवड समितीने ठरविलेल्या दिवशी घेण्यात येईल, तशी सुचना जिल्हा न्यायालय, गोंदिया च्या संकेतस्थळावर प्रसिध्द केल्या जाईल.